# वस्तू व सेवा कर विभाग

## १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम



# 1) संकेतस्थळ (1/3)

**(अ) वापरण्यातील सुलभता (User Friendly) :-**

- वस्तू व सेवा कर विभागामार्फत खालील महत्वपूर्ण कायदे राबविले जातात.


| कायदा | करदात्यांची संख्या | 2024-25 कर संकलन (रु. कोटी) |
|---|---|---|
| महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा (GST) | 17,50,127 | 3,59,854 |
| महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा (MVAT) | 41,497 | 59,252 |
| व्यवसायकर कायदा (PT) | 7,62,630 | 3,105 |

- 2017 मध्ये वस्तू व सेवाकर कायदा लागू झाल्यापासून वस्तू व सेवाकर कायद्याखालील बहुतांशी कामे ही www.gst.gov.in या संकेतस्थळावरुन केली जातात. हे संकेतस्थळ भारत सरकारने विकसित केले आहे.

**केंद सरकारचे वस्तू व सेवा कर संकेतस्थळ**




**महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभागाचे संकेतस्थळ**



# 1) संकेतस्थळ (2/3)

➢ सद्यस्थितीत विभाग खालील चार महत्वपूर्ण संकेतस्थळांचा/प्रणालीचा वापर करतो.

| पोर्टल/प्रणाली | संकेतस्थळ/प्रणाली चा उद्देश |
|---|---|
| www.gst.gov.in | वस्तू व सेवाकर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने विकसित केलेले हे संकेतस्थळ आहे. |
| www.mahagst.gov.in | मुल्यवर्धित कर कायदा व इतर कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी विभागाने विकसित केलेले हे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळाचे नुतनीकरण करण्याकरिता निविदा काढण्यात आल्या आहेत. |
| PRAISE | या अंतर्गत पोर्टलद्वारे अधिकाऱ्यांच्या कार्याचे व्यवस्थापन आणि कार्यक्षमतेचे मोजमाप करणे सहज शक्य झाले. |
| GEMS | अन्वेषण प्रकरणांचे नियमन व व्यवस्थापन करण्याकरिता हे अंतर्गत पोर्टल आहे. |

➢ उपरोक्त सर्व सेवांमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास, त्यांच्या निपटा-यासाठी Service Ticket दाखल करण्याची सुविधा 24X7 उपलब्ध आहे.

**(आ) माहितीचे अद्ययावतीकरण (Updated Information) :-**

**संकेतस्थळावर उपलब्ध अद्ययावत माहिती**

➢ www.gst.gov.in या संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी Goods and Service Tax Network (GSTN) या संस्थेमार्फत अद्ययावत करण्यात येते.

➢ www.mahagst.gov.in या संकेतस्थळावरील सर्व माहिती अद्ययावत करण्यात आलेली आहे. यामध्ये मुल्यवर्धित कर व वस्तू व सेवा कर कायद्याखालील करदाते व संबंधित अधिकारी यांची सुध्दा माहिती उपलब्ध आहे.

➢ सर्व कायदे व नियम, अधिसुचना, परिपत्रके इत्यादी विषयी माहिती अद्ययावत करण्यात आलेली आहे.

# 1) संकेतस्थळ (3/3)

**इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण**

माहितीचा अधिकार कायदा-2005 अंतर्गत कायदा, नियम, अधिसूचना व विभागाकडून मागण्यात येणा-या माहिती इत्यादींची माहिती अद्ययावत करण्यात आली आहे.

**ई) संकेतस्थळाची सुरक्षितता (data / cyber security)**

- www.gst.gov.in संकेतस्थळाबाबत GSTN वर्षभरात मुख्यत दोन प्रकारचे सुरक्षा परीक्षण करते.
  1) बाह्य परीक्षण दरवर्षी ISO मान्यताप्राप्त संस्थेव्दारे केले जाते.
  2) अंतर्गत परीक्षण GSTN च्या अंतर्गत परीक्षण टीमव्दारे केले जाते.

  तसेच, व्यापक सुरक्षा परीक्षण महालेखा परीक्षक (CAG) यांचेव्दारे सुरु आहे.
- www.mahagst.gov.in या संकेतस्थळाच्या सुरक्षिततेसाठी :-
  1) विभागामार्फत नियुक्त सेवाप्रदाता यांचेकडून प्रती सहामाही अंतर्गत परीक्षण केले जाते.
  2) तसेच CERT-In मान्यताप्राप्त सुरक्षा परीक्षकाव्दारे व्यापक सुरक्षा परीक्षण करुन घेण्यात आलेले आहे.

**उ) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलाईन प्रसिध्द करणे-**

- लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत 4 सेवा अधिसुचित करण्यात आल्या आहेत.
- अधिसुचित केलेल्या सर्व चार सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत.
- अधिसुचित सेवांबाबत माहिती अद्ययावत करण्यात आली आहे.

## 2) केंद्र शासनाशी सुसंवाद

अ) हा विभाग करसंकलन करणारा विभाग आहे. राज्याच्या विकासाशी संबंधित कोणतेही प्रस्ताव अथवा विधेयके या विभागाकडून केंद्र शासनाकडे पाठविले जात नाहीत.

आ) उपरोक्त (अ) च्या बाबींमुळे विकासाशी संबंधित केंद्रीय योजनांचा लक्षांक या विभागाला दिला जात नाही.

इ ) केंद्र शासनासोबत संयुक्तपणे कोणतीही योजना या विभागाकडून राबविला जात नाही. यामुळे केंद्रचा हिस्सा प्राप्त करुन घेणे अथवा राज्याचा निधी अर्थसंकल्पित करुन वितरीत करणे आवश्यक नाही.

ई ) जीएसटी परिषदेचा एक सभासद या नात्याने परिषदेच्या विविध विषयांवरील चर्चांमध्ये सहभाग घेऊन महाराष्ट्र राज्य आपले मत नोंदवून संदर्भित सर्व पत्रांवर वेळीच कार्यवाही करण्यात येते.

सबब, शेवटच्या बाबीशिवाय " केंद्र शासनाशी सुसंवाद " हा मुद्दा या विभागाला लागू होत नाही.

# 3) स्वच्छता (1/2)

**अ/आ) अभिलेख निंदणीकरण, वर्गीकरण व मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे**

- वस्तू व सेवाकर कायदा लागू झाल्यानंतर विभागाचे कामकाज, विभागाद्वारे पुरविण्यात येणा-या सेवा व Public Interface असणा-या बाबी या 100% ऑनलाईन पध्दतीने होत असल्याने विभागामध्ये कागदांचा वापर होत नाही.
- Digitalized अभिलेखांचे जतन ऑनलाईन पध्दतीनेच होते. तरीही काही ना काही कारणास्तव तयार होणा-या पुरक धारिण्या (Shadow Files) साठी विशेष राज्यकर आयुक्त यांच्या अभिलेख व्यवस्थापन बाबतच्या ब-194 दि. 05.04.2019 च्या आदेशामध्ये दिलेल्या निर्देशानुसार जुन्या अभिलेखांचे निदंणीकरण, वर्गीकरण व मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे याबाबत कार्यवाही होत आहे.
- 100 दिवसांच्या विशेष मोहिमेदरम्यान 2019 च्या आदेशानुसार आयुक्तालयात केलेल्या कार्यवाहीचा तपशील खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे आहे.

| एकूण धारिण्या | कार्यालयात जतन करावयाच्या धारिण्यांची संख्या | अभिलेख शाखेत जतन करावयाच्या धारिण्यांची संख्या | नष्ट करावयाच्या धारिण्यांची संख्या | नष्ट केलेल्या धारिण्यांची संख्या (16/04/2025 पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| 3,67,078 | 1,54,401 | 1,10,239 | 1,02,438 | 52,586 |



# 3) स्वच्छता (2/2)

**इ/ई) जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण आणि जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट यांची माहिती खालीलप्रमाणे-**

| 01/01/2025 रोजीची संग्रही असलेल्या जड वस्तूंची एकूण संख्या | वस्तूंच्या स्थितीनुसार वर्गवारी संख्या | | | नष्ट करण्यात आलेल्या वस्तूंची संख्या | दुरुस्त करण्यात आलेल्या वस्तूंची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | चांगली | दुरुस्ती करावी लागेल | निष्क्रिय | | |
| 8,371 | 7125 | 409 | 557 | 18 | 389 |

**उ) जुन्या वाहनांचे निर्लेखन**

| | एकूण | शेरा |
|---|---|---|
| निर्लेखित वाहने | 42 | एकूण 42 वाहने निर्लेखित करण्यात आली आहेत. |

# 4) तक्रार निवारण

**अ) आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण -**

**आ) पी. जी.  पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण -**

| पोर्टल | दि. 01/04/2025 पर्यंत प्राप्त तक्रारी | निराकरण केलेल्या तक्रारी | निराकरण केलेल्या तक्रारींचे % | प्रलंबीत तक्रारी | प्रलंबीत तक्रारींचे % |
|---|---|---|---|---|---|
| आपले सरकार | 163 | 162 | 99 | 1 | 1 |
| पी. जी. पोर्टल | 383 | 380 | 99 | 3 | 1 |

**इ) अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिध्दी -** अभ्यागतांना संबंधित अधिका-यांना भेटण्यासाठी वेळा ठरवुन प्रसिध्द करण्याबाबत निर्देशीत  करण्यात आले आहेत.

**ई) लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारींचे निराकरण** - हा विभाग करसंकलन करणारा विभाग आहे. सबब, **लोकशाही दिनाचे आयोजन** हा मुद्दा या विभागाला लागू होत नाही.

# 5) कार्यालयीन सोयी सुविधा (1/3)

**वस्तू व सेवाकर मुख्यालयाच्या 9 मजली दोन संलग्न इमारती मध्ये सुमारे 3,887 कर्मचारी/अभ्यागतांचा वावर आहे.**

**अ) कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था-**

राष्ट्रीय इमारत संहिता (NBC) मानकानुसार दररोज 45 लि. प्रति व्यक्ती पाण्याची आवश्यकता असते

- आयुक्तालय इमारतीमधील दर दिवशी एकूण कर्मचारी व अभ्यागत संख्या - 3887
- एकूण स्वच्छ पाणी साठवण क्षमता - 7,19,915 लिटर
- प्रति व्यक्ति मुबलक स्वच्छ पाण्याची उपलब्धता - 185 लि. प्रति व्यक्ती दर दिवस
- सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य ), मुंबई हे पाणी पिण्यायोग्य असल्याचे तपासणी करुन प्रमाणित करतात.
- सदर टाक्यांची साफसफाई दर सहा महिन्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य ), मुंबई यांचे मार्फत करण्यात येते.

**❑ उपलब्ध पाणी शुध्दीकरण यंत्रे (वॉटर प्युरीफायर्स)**

| एकूण पाणी शुध्दीकरण यंत्रे | शेरा |
|---|---|
| 26 | • सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) मुंबई यांचे मार्फत इमारतीत पिण्याच्या पाण्याकरिता वॉटर प्युरीफायर्स बसविण्यात आले आहेत.<br>• वॉटर प्युरीफायर्स मधील पाणी पिण्यायोग्य असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) मुंबई यांचेकडून प्रमाणित करण्यात येते.<br>• इमारतीत वॉटर प्युरीफायर्स मार्फत एकत्रित थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. |

# 5) कार्यालयीन सोयी सुविधा (2/3)

## आ) कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृह व्यवस्था

| प्रसाधनगृह | पुरुष | महिला | शेरा |
|---|---|---|---|
| प्रसाधनगृहांची संख्या | 51 | 41 | • वस्तू व सेवाकर विभागातील साफसफाई तसेच प्रसाधनगृह स्वच्छतेकरिता कंत्राटदार नेमण्यात आला आहे.<br>• प्रत्येक मजल्यावर 4 स्वच्छता कर्मचा-यांची नेमणुक करण्यात येते. त्यांचेमार्फत दिवसातुन 4 वेळा सर्व प्रसाधनगृहांची स्वच्छता करण्यात येते. तसेच कंत्राटदारामार्फत दुर्गंधी नाशकाचा वापर करण्यात येतो.<br>• प्रत्येक स्वच्छतागृहात हॅन्ड वॉश ठेवण्यात येते.<br>• सर्व स्वच्छतागृहात एक्झॉस्ट पंखे तसेच सिलिंग पंखे बसविण्यात आले आहेत.<br>• सर्व प्रसाधनगृहांच्या दरवाजांवर महिलांकरिता/ पुरुषांकरिता असे नामनिर्देश लावण्यात आले आहेत |


**इ) अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था.**

❖ वस्तू व सेवाकर कार्यालयात येणा-या अभ्यागतांसाठी जुन्या व नवीन इमारतीत प्रत्येक मजल्यावर सुसज्ज प्रतिक्षालय तयार करण्यात आले आहे.






# 5) कार्यालयीन सोयी सुविधा (3/3)




**ई) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे.**

- वस्तू व सेवाकर कार्यालयामध्ये जुनी इमारत तसेच नवीन इमारत येथे प्रत्येक मजल्यावर कार्यालय निहाय नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत.
- जुनी व नवीन इमारतीमधील सर्व उदवाहनांकरीता उदवाहन क्रमांक दर्शविणारे फलक लावण्यात आले आहेत.

**उ) कार्यालयाचे सौंदर्यीकरण.**



- वस्तू व सेवाकर भवनाच्या आवारातील बगीच्यामध्ये विविध प्रकारची फुलझाडे व फळझाडे लावून सौंदर्यीकरण करण्यात आले आहे.
- इमारतीच्या सर्व गेटची दुरुस्ती करुन विभागाच्या नामफलकासह सुशोभिकरण करण्यात आले आहे.
- सुशोभिकरणाच्या हेतूने इमारतीमधील दर्शनीय भागात लहान झाडांसह कुंडया ठेवण्यात आल्या आहेत.
- प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला सर्व कार्यालयात विद्युत रोषणाई करण्यात येते.
- **नवीन इमारत :-** वडाळा येथे विभागाकरिता सर्व सोयींनी सुसज्ज, हरित कार्यालय इमारत तयार करण्यात येत आहे. इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. यामध्ये 24 मजल्यांच्या 2 आणि 22 मजल्यांच्या 2 अशा 4 इमारतींचा समावेश आहे. यापैकी साधरणत: 7 मजल्यांपर्यंतचे बांधकाम पूर्ण झाले आहे.



## 6) कामकाजातील सुधारणा

**अ/आ) ई-ऑफिस प्रणाली/ई-ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नस्त्यांची टक्केवारी (%)**

- सर्व करदात्यांशी सर्व संवाद, अर्ध न्यायीक आदेश इत्यादी www.gst.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन होतो.
- PRAISE आणि GEMS पोर्टलद्वारे अधिका-यांच्या कामाचे नियमन व पर्यवेक्षण करण्यात येते.
- करदात्यांना सर्व सेवा ऑनलाईन माध्यमातुन पुरविण्यात येतात. तसेच, आंतर कार्यालयीन पत्रव्यवहार प्रामुख्याने ई-मेल द्वारे होतो.

**इ) वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांबाबत स्पष्टीकरण/ खुलासा वेळीच प्रसिध्द करणे.**

- वस्तू व सेवाकर विभागाशी निगडीत शासन विरोधी बातम्या प्रसिध्द झाल्यास वरिष्ठाच्या मान्यतेने DGIPR यांना खुलासा सादर केला जातो.
- विभागामार्फत कर वसुली, त्या अनुषंगाने लिलाव, विभागाची निविदा प्रक्रिया, महत्वाची अन्वेषण कार्यवाही, अभय योजना इत्यादी करिता प्रेस नोट जाहीर करण्यात येते.

**ई) Ease of living अंतर्गत विभागातील सेवांचे सुलभीकरण करणे.**

**GSK-GST सुविधा केंद्र स्थापना**

- नोंदणी दाखला मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करणे व त्याचबरोबर खोट्या नोंदी व त्याद्वारे खोट्या ITC रॅकेटस वर आळा घालून महसुल वाढविण्यासाठी महाराष्ट्रात एकुण 28 GSK सुविधा केंद्रांची स्थापना फेब्रुवारी 2025 मध्ये करण्यात आली आहे.
- सदर GSK सुविधा केंद्रांमध्ये आधार आधारित माहिती बायोमॅट्रीक प्रणालीच्या माध्यमातुन भौतिक परिक्षण करून संशयित प्रकरणांमध्ये नवीन नोंदणी देण्याबाबत निर्णय घेण्यात येतात.
- गुजरात राज्याने सर्वप्रथम Pilot Basis वर प्रकल्प राबविल्यानंतर 07/02/2025 पासुन प्रकल्प पुर्णपणे राबविणारे महाराष्ट्र राज्य हे **पहिलेच राज्य** आहे.



# 7) अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) (1/4)

**अ) नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे**

कर संकलन ही तांत्रिक बाब असल्याने वस्तू व सेवाकर विभागात नवीन तसेच सेवेत असलेले अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता सर्वसमावेशक प्रशिक्षण धोरण तयार करण्यात आले आहे.

**1) राज्य प्रशिक्षण धोरण 2011 अनुषंगाने विभागातर्फे घेण्यात येणा-या पायाभूत प्रशिक्षणाचा तपशील:**

| प्रशिक्षणाचा संवर्ग | प्रशिक्षणाचा कालावधी | प्रशिक्षणार्थींची संख्या (2024-25) | नियोजित प्रशिक्षणार्थींची संख्या (2025-26) |
|---|---|---|---|
| राज्यकर निरीक्षक | दोन आठवडे | 139 | 300 |
| कर सहायक | चार आठवडे | 145 | 350 |
| सहायक राज्यकर आयुक्त | दोन वर्ष | 0 | 44 |

**2) अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण प्रणाली - 2025**

सेवेत असणा-या अधिकारी व कर्मचा-यांसाठी जानेवारी 2025 मध्ये प्रशिक्षण धोरण आखण्यात आले आहे.

- विभागाने त्रिस्तरीय सेवांतर्गत प्रशिक्षण धोरण तयार करुन त्याअंतर्गत 2025 मध्ये 78 प्रशिक्षण घटक निर्माण केले आहेत. सदर धोरण प्रशिक्षणाच्या बाबी पुस्तक रुपाने प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. (GST Training Policy Book)
- यात बदलीनंतरच्या व उजळणी प्रशिक्षणाचा सुध्दा समावेश आहे.
- मोहिमे दरम्यान एकूण 6,945 प्रशिक्षणार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले.



# 7) अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) (2/4)

## 3) iGOT पोर्टलवर अधिकारी व कर्मचारी यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाची सद्यस्थिती.

| पदनाम | कार्यरत मनुष्यबळ | iGOT वरील एकूण नोंदणी | नोंदणी टक्केवारी (%) | 5 कोर्स पूर्ण करणा-यांची संख्या | किमान 1 कोर्स पूर्ण करणा-यांची संख्या | एकूण पूर्ण केलेल्या कोर्सची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| अधिकारी | 2,298 | 2,298 | 100% | 1,474 | 1,781 | 9,096 |
| कर्मचारी | 5,822 | 5,822 | 100% | 2,384 | 3,013 | 14,799 |
| एकूण | 8,120 | 8,120 | 100% | 3,858 | 4,794 | 23,895 |

## आ) सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहीणे

| संवर्ग | स्वरूप | एकूण CR (संख्या) | कार्यवाही पूर्ण केलेले CR (संख्या) | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|---|
| अधिकारी | Online | 4,506 | 3,984 | 88.41 |
| कर्मचारी | Offline | 5,904 | 5,753 | 97.44 |

## इ) सेवा जेष्ठता याद्या प्रसिध्द करणे व पदोन्नत्या करणे.

➢ <u>सेवा जेष्ठता याद्या प्रसिध्द करणे</u>

| सेवा जेष्ठतेचे पदनाम | जेष्ठता यादी प्रसिध्दी दिनांक | शेरा |
|---|---|---|
| अपर राज्यकर आयुक्त, राज्यकर सहआयुक्त, राज्यकर उपायुक्त, राज्यकर सहायक आयुक्त, राज्यकर अधिकारी | 01/01/2024 | अंतिम यादी प्रसिध्द |
| राज्यकर निरीक्षक, कर सहायक | 01/01/2024 | तात्पुरती यादी प्रसिध्द |

# 7) अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) (3/4)

➤ **पदोन्नतीबाबत सद्यस्थिती:-**

| अ क्र | पदोन्नतीचा संवर्ग | पदोन्नती स्थिती |
|---|---|---|
| 1 | राज्यकर सहआयुक्त ते अपर राज्यकर आयुक्त | प्रस्ताव दि. 17/03/2025 रोजी शासनास सादर |
| 2 | राज्यकर उपायुक्त ते राज्यकर सहआयुक्त | प्रस्ताव दि. 18/03/2025 रोजी शासनास सादर |
| 3 | राज्यकर सहायक आयुक्त ते राज्यकर उपायुक्त | विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि. 26/03/2025 रोजी पार पडून इतिवृत्तांत शासनास सादर. |
| 4 | राज्यकर अधिकारी ते राज्यकर सहायक आयुक्त | शासनाकडून दि. 11/04/2025 रोजी दिव्यांग आरक्षण निश्चिती प्राप्त. येत्या आठवड्यात बैठक प्रस्तावित. |
| 5 | राज्यकर निरीक्षक ते राज्यकर अधिकारी | दिव्यांग आरक्षण निश्चिती शासनाकडून प्राप्त झाल्यावर विभागीय पदोन्नती समितीची बैठक प्रस्तावित |
| 6 | कर सहायक ते राज्यकर निरीक्षक | दि. 04/04/2025 रोजी विभागीच पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली |
| 7 | वर्ग 4 संवर्ग ते कर सहायक | पदोन्नती आदेश निर्गमीत दि. 11.04.2025 |

**ई) न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा करणे**

| न्यायालयीन प्रकरणे | | |
|---|---|---|
| | प्रकरणे | शेरा |
| प्रलंबीत प्रकरणे | 116 | |
| शपथपत्र दाखल | 109 | |
| शपथपत्र दाखल प्रक्रियाधिन | 7 | 28 एप्रिल 2025 पर्यंत शपथपत्र दाखल करणे नियोजित |

| विभागीय चौकशी प्रकरणे | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रलंबित प्रकरणे | चौकशी व सादरकर्ता अधिकारी नियुक्त | चौकशी अहवाल प्राप्त प्रकरणे | चौकशी अहवाल अप्राप्त प्रकरणे |
| दि. 01.04.2024 रोजीची स्थिती | 110 | 84 | 54 | 30 |
| 2024-25 मधील प्रकरणे | 11 | 5 | 0 | विनंती पत्रे पाठविण्यात आली |

# 7) अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) (4/4)

## उ) कार्यालयातील कामकाज अचुक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) वापर करणे

कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करण्याकरिता Economic Intelligence Unit (आर्थिक बुध्दीमत्ता कक्ष) विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे. डेटा ॲनालेटिक्सच्या माध्यमातून कर्मचारी तसेच अधिकारी यांची कार्यक्षमता वृध्दींगत करण्याकरिता कार्यरत आहे.
आर्थिक बुध्दीमत्ता कक्ष BI Tools चा वापर करुन कामाचे पर्यवेक्षण, जोखीम व्यवस्थापन आणि निर्णय प्रक्रिया प्रभावीपणे करते.

| Business Intelligence (BI) Tools | | |
|---|---|---|
| **BIFA**<br>(Business Intelligence And Fraud Analysis) | **AIMS**<br>(Analytical Intelligence Management System) | **PRAISE**<br>(Performance Reporting & Information Support Environment) |
| 1.AI आणि ML या साधनांचा वापर करून BIFA रिअल टाईम डाटा मॉनेटरींग करते.<br>2.अंतरराज्यीय फसवणूकीची प्रकरणे  शोधणे यासाठी BIFA अत्यंत उपयुक्त आहे.<br>3. अन्वेषण आणि लेखापरिक्षण यासाठीची प्रकरणे शोधण्यासाठी BIFA चा मुख्यत: उपयोग होतो | 1.विभागाने विकसित केलेल्या AIMS च्या माध्यमातून अधिका-यांना विश्लेषणात्मक बाबी उपलब्ध होतात.<br>2.ॲडव्हान्स डेटा व्हिज्युअलायझेशन आणि रिपोर्टींग यासाठी टॅब्लू चा वापर केला जातो. | 1.विभागाअंतर्गत कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी आणि क्षेत्रीय कार्यालयाशी माहितीची देवाण-घेवाण यासाठी PRAISE वापरले जाते.<br>2.PRAISE द्वारे खालील माहिती उपतब्ध होते.<br>- करदात्याचे प्रोफाईल<br>- महसूल जोखीम प्रोफाईल<br>- NGTP करदाते शोधणे<br>- पुरवठा साखळी विश्लेषण |

# 8) आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन (1/2)

**अ - आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे.**

- औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्या-या योजनांची उद्योग विभागाकडून अंमलबजावणी करण्यात येते.
- यामध्ये सामान्यापणे पात्र घटकांना त्यांनी भरलेल्या राज्य वस्तू व सेवा कराचा (SGST) परतावा देण्यात येतो. परतावा देण्यासाठी या योजनांशी संबंधित आवश्यक माहिती या विभागाकडून उद्योग विभागाला पुरविण्यात येते.
- **औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्या-या खालील योजना आहेत.**

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजना वर्ष |
|---|---|---|
| 1 | औद्योगिक प्रोत्साहन योजना | 2001, 2007, 2013, 2019 |
| 2 | वाईन उद्योगास प्रोत्साहन अनुदान योजना | 2001, 2009, 2024 |
| 3 | पर्यटन उद्योगास प्रोत्साहन अनुदान योजना | 2006, 2016, 2024 |
| 4 | काजू उद्योगास प्रोत्साहन अनुदान योजना | 2010, 2020 |

# 8) आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन (2/2)

**आ/इ - व्यापारी वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे/ अडचणींचे निराकरण करणे-**

**1) तक्रार निवारण समिती (Grievance Redressal Committee)**

- करदात्यांसाठी त्यांना येणा-या अडचणी व तक्रारी मांडण्यासाठी राज्य व केंद्र शासन यांच्याद्वारे संयुक्त व्यासपीठ Grievance Redressal Committee ची स्थापना (नागपुर, पुणे, मुंबई) येथे करण्यात आली आहे. समितीच्या सामान्यपणे त्रैमासिक बैठका होतात.
- या बैठकांना विविध करसल्लागार संघटना, व्यापारी संघटना, भारतीय उद्योग तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतात. सदर चर्चेमध्ये प्राप्त तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात येते.

**2) सेवा कक्ष (Service Cell)**

- विविध करसल्लागार संघटना, Confederation of Indian Industy (CII), Federation of Indian Chambers of Commerce and Industry (FICCI), Bharat Merchants Chambers,Federation of Indian Export organization (FIEO), Indian Bank Assocation (IBA) इत्यादी सारख्या व्यापारी संघटना व भारतीय उद्योग परिसंघ यांच्यासोबत मा. राज्यकर आयुक्त तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत सेवा कक्षाची (Service Cell) बैठक घेऊन प्राप्त तक्रारींचे/अडचणींचे तात्काळ निराकरण करण्यात येते.
- वित्तीय वर्ष 2024-25 मध्ये अशा पाच बैठकांमधून प्राप्त झालेल्या सर्व 74 अडचणींचे निराकरण करण्यात आले.

**ई - गुंतवणुकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे-**

- हा विभाग करसंकलन करणारा विभाग आहे. सबब, कायदा व सुव्यवस्था हा मुद्दा या विभागाला लागू होत नाही.




## 9) नाविन्यपुर्ण उपक्रम- सुकर जीवनमान

**अ - नागरिक केंद्रीत सेवांचे सुलभीकरण-**

**1. अभय योजना (वस्तू व सेवाकर कायदा)-**

- वस्तू व सेवाकर कायदा नवीन असल्याने करदात्यांना विवरणपत्रे दाखल करण्यास तसेच कर भरण्यास अनेक अडचणी येत होत्या. अभय योजना दि 01/11/2024 ते 31/03/2025 या कालावधीमध्ये लागू होती. यामध्ये कराचा पूर्ण भरणा केल्यास व्याज व शास्ती माफीची सवलत होती.
- याकरिता विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांनी 08/10/2024 ते 13/03/2025 कालावधीत 39 बैठका घेऊन योजनेबाबत माहिती देऊन योजनेत भाग घेण्यास प्रवृत्त केले.
- या अभय योजनेचा सुमारे 17,251 एवढ्या करदात्यांनी लाभ घेतला.

**2. राज्य अभय योजना (वस्तू व सेवाकर वगळून इतर राज्य कायदे) :-**




- या योजनेला 100 दिवसांच्या मोहिमेदरम्यान मंजुरी प्राप्त होऊन सदर योजनेचा कालावधी दि 21/03/2025 ते 31/12/2025 असा आहे.
- राज्य व केंद्र शासनाच्या सार्वजनीक उपक्रम असलेल्या (PSU) कंपन्यांच्या थकित करांच्या वसुलीकरिता व प्रलंबीत अपिल प्रकरणांच्या निपटा-याकरिताची योजना.
- योजनेत निर्देशित रक्कमेचा भरणा केल्यास त्या कालावधीचा उर्वरीत कर, संपूर्ण व्याज व शास्ती माफ केली जाते.
- या योजनेअंतर्गत आजपर्यंत सर्वात मोठा रुपये 2,472 कोटी एवढा महसूल भरणा एकाच प्रकरणात झाला आहे.

## 10) नाविन्यपूर्ण उपक्रम:- कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा (1/2)

### (I) विश्लेषणावर आधारीत अति जोखीम प्रकरणे निवडणे.

| GEMS<br>(GST Enforcement Management System) | PRAISE<br>(Performance Reporting & Information Support Environment) |
|---|---|
| • अन्वेषणासाठी ऑनलाईन रिअल टाईम मॉनिटरिंग करण्यासाठी GEMS प्रणाली ची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य.<br>• यामध्ये अन्वेषणाचे सुरुवातीपासुन शेवटपर्यंत नियमन करणे शक्य झाले<br>• तपासणी आणि शोध याबाबत भेटीसंबंधित कार्यवाही 21 दिवसात पूर्ण करणे शक्य.<br>• सर्व अन्वेषण प्रकरणे, मिळालेला महसूल इत्यादी माहिती एकत्रित उपलब्ध.<br>• अधिका-यांच्या कामावर, येणा-या महसूलावर आयुक्तालयातून लक्ष ठेवणे शक्य.<br>• **दृष्य लाभ** - अन्वेषणाच्या भेटींची संख्या 40% कमी करूनही रोख महसूल वसुली मध्ये 34% वाढ झाली. | • विभागातील सर्व अधिका-यांच्या कामगिरीचे पर्यवेक्षण आणि त्यात सुधारणा करणे यासाठी विकसित केले आहे.<br>• मुख्यालयातून सर्व विभागातील अधिका-यांना प्रकरणे पाठवून त्यांनी त्यावर केलेल्या कामाची माहिती तसेच जमा महसूल, नोंदणी, वसुली व परतावा म्हणजेच केलेल्या कामांची रिअल टाईम माहिती मिळते.<br>• मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालय यांच्यातील समन्वय वृध्दींगत होतो.<br>• क्षेत्रीय कार्यालयांना त्यांच्या अंतर्गत विभागाची कामगिरी तपासून वेळीच सुधारण्यासाठी मदत करते. |

**या प्रणालीचा उत्कृष्ट अवलंब करुन वस्तू व सेवा कर विभागाने विक्रमी 2.25 लाख कोटी रुपयांचा महसूल जमा केला आहे. GST महसूलामध्ये 15.6% वाढ नोंदविली आहे, हि वाढ प्रमुख राज्यांमध्ये सर्वाधिक आहे.**

# 10) नाविन्यपूर्ण उपक्रम:- कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा (2/2)

## (II) इंद्रधनुष्य 2025

- वस्तू व सेवाकर विभागाने प्रथमच जानेवारी 2025 मध्ये राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम व खेळांचे आयोजन केले.
- सदर कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय क्रिडा संकुल येथे विभागातील सर्व क्षेत्रीय कार्यालयामधील अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्यातील कलागुण व क्रिडा गुणांना वाव मिळावा म्हणून 3 दिवसीय कार्यक्रम घेण्यात आला.
- महाराष्ट्रातील 1000 पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.
- या सर्व 16 क्षेत्रीय कार्यालयांमधून सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रथम 2 क्षेत्रीय कार्यालयांनाआयुक्त चषक व विशेष आयुक्त चषक देऊन गौरविण्यात आले.
- दैनंदिन धकाधकीच्या व तणावाच्या आयुष्यातून शारिरीक व मानसिक क्षमता वृध्दीकरणासाठी सदर कार्यक्रमाची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सर्व उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी दिले.

